महाराष्ट्र विधानसभा

पहिले अधिवेशन, २०१९

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील आरोग्य उपकेंद्रांपैकी काही उपकेंद्रात प्रसुतीगृहे नसल्याबाबत

(१) १८३९४ (१४-०८-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील ४८ आरोग्य उपकेंद्रांपैकी ३४ उपकेंद्रात प्रसुतीगृहे नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रसुतीगृहे नसल्याने गर्भवती महिलांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या उपकेंद्रांमध्ये प्रसुतीगृहे सुरु करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) असल्यास, ही प्रसुतीगृहे केव्हा सुरु करण्यात येतील व नसल्यास, त्याची कारणे कोणती ?

डॉ. दीपक सावंत (१९-१२-२०१८) : (१) हे अंशत: खरे आहे.

खेड तालुक्यातील जिल्हा रत्नागिरी येथे ४८ आरोग्य उपकेंद्रापैकी २३ उपकेंद्रात प्रसूतीगृहे बांधण्यात आली असून उर्वरित २५ उपकेंद्रापैकी २ ठिकाणी प्रसूतीगृहाचे बांधकाम सूरु आहे. १८ उपकेंद्रामध्ये प्रसुतीगृहासाठी जागा उपलब्ध नाहीत व ५ ठिकाणी उपकेंद्राच्या इमारती आहेत पंरतू प्रसूतीगृह इमारती नाहीत.

(२) हे खरे नाही.

प्रसूतीगृह उपलब्ध नसलेल्या ग्रामीण भागातील महिलांना प्रसूतीगृह उपलब्ध असलेल्या उपकेंद्रामध्ये व प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये पाठवून आरोग्य संस्थामध्ये प्रसुती केल्या जातात.

(३) ज्या उपकेद्रांच्या ठिकाणी प्रसूतीगृहे बांधकामासाठी जागा उपलब्ध नाही तेथे जागा उपलब्ध करणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पेण (जि.रायगड) येथे सुसज्ज रुग्णालय बांधणेबाबत

(२) २०१५१ (१७-०८-२०१५). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-कोकण-गोवा महामार्गावर सातत्याने अपघात होत असल्याने अपघातग्रस्तांना मुंबई येथे उपचारासाठी जावे लागत असल्याने बऱ्याचवेळा वाटेतच अपघातग्रस्त मृत्यू पावतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पेण (जि.रायगड) तालुक्यात सुसज्ज सर्व सुविधायुक्त रुग्णालय बांधणेबाबत लोकप्रतिनिधीनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन सदर ठिकाणी महामार्गालगत सुसज्ज व सुविधायुक्त रुग्णालयात बांधणार आहे काय ?

डॉ. दीपक सावंत (१९-१२-२०१८) : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारित राज्यात आरोग्य संस्था स्थापनेचा बृहत आराखडा मंजूर करण्यात आला असून शासन निर्णय दिनांक १७/१/१३ अन्वये पेण तालुक्यात वडखळ नाका येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय व २० खाटांचे ट्रामा केअर युनिट स्थापन करण्यास मान्यता दिलेली आहे यासाठी जागा उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

सेंट जॉर्जस रुग्णालयात (मुंबई) गंभीर जखमी असलेल्या रुग्णास दाखल करुन न घेतल्याबाबत

(३) २३९७२ (३१-०७-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेंट जॉर्ज रुग्णालयात (मुंबई) गंभीर जखमी असलेल्या रुग्णाची प्रकृती चिंताजनक असल्याचे सोबत असलेले पोलिस उपनिरीक्षक सांगत असतानासुध्दा डॉक्टर व वॉर्डबॉय यांनी जखमी प्रवासी रुग्णाला रुग्णालयात दाखल करुन न घेता ताटकळत ठेवल्याप्रकरणी पोलिसांनीच रुग्णालयाच्या संबंधित डॉक्टर व वॉर्डबॉय विरोधात माता रमाई आंबडेकर मार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असल्याचे दिनांक ६ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित डॉक्टर व वॉर्डबॉय यांच्यावर शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (११-०२-२०१९) : (१) दिनांक ४ जून, २०१५ रोजी रेल्वे पोलिसांनी एका रूग्णास सेंट जॉर्ज रूग्णालयाच्या अपघात विभागात उपचारासाठी आणले होते.सदर रूग्णास दाखल करून घेऊन त्यावर आवश्यक ते औषधोपचार करण्यात आले.त्यामुळे रूग्णास दाखल न करून घेता ताटकळत ठेवण्यात आले असे म्हणणे खरे नाही.मात्र या प्रकरणी रेल्वे पोलिसांनी स्वत:हून संबधित डॉक्ट व वार्डबॉय यांच्या विरूद्ध माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल केला आहे हे खरे आहे.

(२) व (३) सदर रूग्णाने त्याचेवर उपचार करणाऱ्या डॉक्टर व कर्मचाऱ्यांकडून उपचारा दरम्यान व सपूर्ण प्रक्रिये दरम्यान ताटकळत ठेवण्याचा प्रकार झाला नसल्याचे लेखी निवेदन रूग्णालय प्रशासनास दिले असल्याने संबधितांविरूद्ध कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला शव विच्छेदन केंद्राचा ताबा मिळण्याबाबत

(४) ४०४६६ (०३-०५-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जे. जे. रुग्णालय व ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या आवारात असलेल्या शव विच्छेदन केंद्राचा ताबा हा ग्रँट वैद्यकीय महाविद्यालयाला मिळावा अशी मागणी असल्याचे माहे डिसेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गृह विभाग व वैद्यकीय शिक्षण विभागाने सन २००१ साली घेतलेल्या निर्णयानुसार शव विच्छेदन केंद्र हे न्याय वैद्यकशास्त्र विभागाच्या अधिपत्याखाली असावे, अशी स्पष्ट भूमिका आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला शव विच्छेदन केंद्राचा ताबा मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला केंव्हापर्यंत शव विच्छेदन केंद्राचा ताबा दिला जाणार,

(५) शासनाने यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (११-०२-२०१९) : (१) होय.

(२), (३) व (४) ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी. समूह रुग्णालये येथील पोलिस शल्यचिकित्सक यांच्या तांत्रिक व प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेले शवविच्छेदन केंद्र (जे.जे.पी.एम. सेंटर) पूर्वीच्या कोरोनर कोर्टाच्या इमारतीसह, अधिष्ठाता, ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,मुंबई यांच्या प्रशासकीय व तांत्रिक नियंत्रणाखाली हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव गृह विभागास सादर करण्यात आला आहे. उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने मान्यता प्राप्त झाल्यानंतर शव विच्छेदन केंद्राचा ताबा घेण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(५) लागू नाही.

मुंबईतील सार्वजनिक रुग्णालयातील अस्वच्छता वाढत असल्याबाबत

(५) ५३७४१ (२९-०८-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाजगी वैद्यकीय सेवा प्रचंड महागल्यामुळे मुंबईतील शासकीय तसेच महानगर पालिकेच्या रुग्णालयामध्ये उपचार घेण्यासाठी येणाऱ्या रुग्णांच्या संख्येमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे, तथापि सफाई कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या, देखभालीचा अभाव व सार्वजनिक स्वच्छतेबाबतची उदासिनता यामुळे शासकीय तसेच महानगरपालिकेच्या रुग्णालयामध्ये स्वच्छता होत नसल्याने अस्वच्छेतेचे प्रमाण वाढत असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केलेल्या पाहणीत निदर्शनास आले, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने शासकीय तसेच महानगरपालिकांच्या रुग्णालयातील सार्वजनिक स्वच्छतेच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०२-२०१९) :(१) नाही.

(२) प्रश्न उद्भ्ावत नाही.

(३) लागू नाही.

सोलापूर शहरातील श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयास सन २०१५-२०१६ या वर्षाचे अनुदान मिळाले नसल्याबाबत

(६) ६०३३२ (२२-०८-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्रप्रदेश येथून अनेक रुग्ण उपचारासाठी येत असल्याने या रुग्णालयात रुग्णांना सोयी सुविधा पुरविण्यासाठी सन २०१५-२०१६ या वित्तिय वर्षाकरिता वारंवार मागणी करुनही पुरवणी अनुदान मिळाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५-२०१६चे पुरवणी अनुदान मिळण्याबाबत अधिष्ठाता, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय यांनी दिनांक १५ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. गिरीष महाजन (०४-०२-२०१९) : (१) होय.
(२) होय, दि. १२/५/२०१६ अन्वये संस्थेने संचालकांना निवेदन सादर केले आहे.
(३) सदर संस्थेला (२१) सामुग्री व पुरवठा या उद्दिष्टअन्वये सन २०१६-१७ या वर्षात रु. ५.९५ कोटी, सन २०१७-१८ या वर्षात रु. ४.७८ कोटी, सन २०१८-१९ या वर्षात रु. १३.४० कोटी इतके अनुदान मंजुर व वितरित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भ्ावत नाही.

पुणे, ससून सर्वोपचार रुग्णालयात दिव्यांगांना मिळणाऱ्या प्रमाणपत्राबाबत

(७) ६७३०८ (१६-१२-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे, ससून सर्वोपचार रुग्णालयात दिव्यांगांना प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी बराच त्रास होत असल्याचे दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय
(२) असल्यास, प्रमाणपत्रासाठी येणाऱ्या दिव्यांगाना (स्त्री-पुरुष) मुलाबाळांसहित आदल्या दिवशी रात्रीपासून रांगेत ताटकळत थांबावे लागत आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, दिव्यांगांची प्रमाणपत्रासाठी होणारी गैरसोय ही अतिशय गंभीर बाब असून प्रमाणपत्र प्राप्त करण्याची प्रक्रिया सुकर करण्याच्या दृष्टीने शासनस्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०८-०२-२०१९) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भ्ावत नाही.
(४) लागू नाही.

सोलापूर येथील सिव्हिल रुग्णालयात औषधे व एक्सरे फिल्मचा निर्माण झालेला तुटवडा

(८) ७०४४० (१०-०१-२०१७). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर येथील सिव्हिल रुग्णालयात औषधे व एक्सरे फिल्मचा तुटवडा निर्माण झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार रुग्णांना रुग्णालयामार्फत मोफत औषधे मिळावीत व एक्सरे माफक दरात काढला जावा म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०२-२०१९) : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भ्ावत नाही.
(३) व (४) लागू नाही.

सीपीआर रुग्णालय (जि.कोल्हापूर) येथे रक्त तपासणीसाठी लागणाऱ्या कीट्सचा निर्माण झालेला तुटवडा

(९) ७४४४० (१९-०४-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सीपीआर रुग्णालय (जि.कोल्हापूर) येथे रक्त तपासणीसाठी लागणाऱ्या कीट्सचा तुटवडा निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार कोल्हापूर येथील सीपीआर रुग्णालयामध्ये रक्त तपासणीसाठी लागणारे कीट्स पुरेश्या प्रमाणात पुरविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. गिरीष महाजन (०८-०२-२०१९) : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भ्ावत नाही.
(३) प्रश्न उद्भ्ावत नाही.
(४) लागू नाही.

नागपूर शहरातील रूग्णालयमध्ये विविध आजारावरील औषधांच्या साठयात तुटवडा निर्माण झाल्याबाबत

(१०) ७८६६६ (२०-०४-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय व इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयमध्ये विविध आजारावरील अत्यंत महत्वांच्या औषधांच्या साठयात मोठया प्रमाणात तुटवडा निर्माण झाल्याबाबतची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रूग्णालयातील फॉरेमोटेरॉल किंवा सालमेटेरॉल सारख्या अनेक आवश्यक असलेल्या औषधांचा साठा रूग्णालयात उपलब्ध नसल्यामुळे रूग्णांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या महत्वपुर्ण औषधांच्या साठयाच्या तुटवडयाकडे दुर्लक्ष करणा-या आरोग्य विभाग व रूग्णालयाच्या अधिका-यांवर व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, या औषधांचा साठयात तुट निर्माण होऊ नये याकरीता शासनाने कोणती उपाययोजन केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०२-२०१९) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. फॉरमोटेरॉल किंवा सालमेटेरॉल ही औषधी मान्यता प्राप्त यादीत नसल्यामुळे खरेदी केल्या जात नाही, परंतू याला पर्यायी असणारी औषधी जसे Respiratory Solution, Busesonide Respiratiory Solution and Doulin Respiratory Solution (Levosalbutamol + Ipratr opium bromide) ही रूग्णांना लागणारी औषधी इ.एस.आय.सी. दरकरारधारकांकडून उपलब्ध करून दिल्या जातात.
(३) व (४) प्रश्न उद्भ्ावत नाही.
(५) लागू नाही.

राज्यात डॉक्टरांच्या मागण्यासाठी संप करु नये यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची सूचना

(११) ८६३४८ (११-०८-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात डॉक्टरांनी त्यांच्या मागण्याबाबत संप करु नये यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची सूचना उच्च न्यायालयाने राज्य शासनाला केली असल्याचे माहे एप्रिल २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय
(२) असल्यास मा.उच्च न्यायालयाच्या या सूचनेनुसार शासनाने सदर उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. गिरीष महाजन (०४-०२-२०१९) : (१) हे अंशत: खरे आहे. सदरची समिती निवासी डॉक्टरांच्या मार्ड संघटनेची निवेदने/गाऱ्हाणी यावर निर्णय घेण्यासाठी गठीत करण्यात आली आहे.
(२) शासन निर्णय दिनांक १२ ऑक्टोबर, २०१७ अन्वये उच्चाधिकार समिती गठीत करण्यात आलेली आहे.
(३) लागू नाही.

बैलमाराखेडा (ता.भातकुली, जि.अमरावती) येथील नाल्यावर ब्रिज-कम बंधारा बांधण्याबाबत

(१२) ९२२७१ (२१-०८-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बैलमाराखेडा (ता.भातकुली, जि.अमरावती) येथील नाल्यावर ब्रीज-कम बंधारा बांधण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिनांक १५ मार्च, २०१७ रोजी तसेच त्यापूर्वीही वांरवार लेखी निवेदन देवूनही अद्यापी याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार बैलमाराखेडा येथील नाल्यावर तात्काळ ब्रीज-कम बंधारा बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे (०६-०२-२०१९) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, अमरावती यांचेमार्फत प्राथमिक सर्वेक्षण करण्यात आले असून ब्रिज-क्रम बंधारा बांधण्याकरिता सदर स्थळ तांत्रिकदृष्ट्या योग्य वाटत नाही तसेच नमूद ठिकाणी काळ्या मातीचा भूस्तर असल्याने पायव्याकरिता आवश्यक कठीण भूस्तर आढळत नाही.

(४) प्रश्न उद्भ्ावत नाही.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान (बोरिवली) येथील कृष्णगिरी उपवनाच्या जागेवर वाहनतळ उभारण्यात येत असल्याबाबत

(१३) ९३०२२ (२३-०८-२०१७). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात सन २०१३ चे सुमारास १० लक्ष रुपये खर्च करुन 'कृष्णगिरी' उपवन बांधण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या राष्ट्रीय उद्यानात येणाऱ्या पर्यटकांच्या वाहनांसाठी एक हेक्टर भूखंडावर वाहनतळ बांधण्यासाठी अवघ्या ३ वर्षापूर्वी १० लक्ष रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या 'कृष्णगिरी' उपवनाचा जागेचा वापर करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लाखो रुपये खर्चुन उभारलेल्या या उपवनाच्या जागी वाहनतळ उभारल्याने पर्यावरणाचाही ऱ्हास होत असल्याने उपवनात येणाऱ्या वाहनांच्या पार्किंगची सोय करण्याऐवजी प्रवेशद्वारावरच बहूमजली अथवा भुयारी वाहनतळ उभारावे असा पर्याय पर्यावरण अभ्यासकांनी महानगरपालिका व उद्यान प्रशासनाला सुचविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०२-२०१९) : (१) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामार्फत पार्किंग स्थळासाठी निवडण्यात आलेल्या जागेत सन २०१३ मध्ये निसर्ग परिचय उद्यानाची निर्मिती करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात प्रवेश करणाऱ्या वाहनांमुळे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी उद्यानाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ वाहनांसाठी पार्किंग स्थळ करणे आवश्यक आहे.

४०० ते ५०० वाहने एकाच ठिकाणी पार्किंग करण्याकरीता सद्यस्थितीत उद्यानाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळील निसर्ग परिचय उद्यानाच्या जागेव्यतिरिक्त दुसरी पर्यायी जागा उपलब्ध नाही. सदर उद्यानाचा संपूर्ण भाग पार्किंग स्थळासाठी न वापरता फक्त ०.९९ हे. क्षेत्राचाच वापर करण्यात येणार आहे व उर्वरित भाग हा कृष्णगिरी उपवनासाठी राखीव ठेवण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयांमध्ये औषधांचा निर्माण झालेला तुटवडा

(१४) ९४९३५ (२४-१०-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १६ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि सलग्न रुग्णालये यांसाठी औषधे व उपकरणे खरेदी करण्यासाठी दरवर्षी सुमारे १२५ कोटी रुपये खर्च होतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षासाठी औषधे व उपकरणे खरेदी करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण विभागाकडे निधी नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०२-२०१९) : (१) हे खरे नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईत सोशल मिडियाच्या अतिवापरामुळे मानसिक आजाराच्या रुग्णांच्या संख्येत होत असलेली वाढ

(१५) ९५३०७ (२७-१२-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईकरांना इंटरनेट आणि सोशल मिडियाच्या अति वापरामुळे मानसिक आजारपण आणि ताणतणाव वाढल्याने मानसिक आजाराचे रुग्णांच्या संख्येत वाढ होत असल्याचे जे.जे. रुग्णालयाने माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान सादर केलेल्या अहवालामध्ये नमूद केले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे मानसोपचार तज्ञांची सर्वाधिक गरज असल्याचेही नमूद करण्यात आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. गिरीष महाजन (०४-०२-२०१९) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भ्ावत नाही.

बोरीवली (पूर्व) येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीतील कुटुंब पुनर्वसनापासून वंचित असल्याबाबत

(१६) ९८२८९ (३०-१२-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवली (पूर्व) येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीतील पात्र ३२ हजार कुटुंबापैकी १२ हजार कुटुंबाचे चांदिवली येथे पुनर्वसन करण्यात आले परंतू अद्याप उर्वरित १८ हजार रहिवाशी कुटुंबे पुनर्वसनापासून अद्यापही वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसन (एसआरए) योजने अंतर्गत सन २००२ पर्यंतच्या रहिवाशी कुटुंबांना संरक्षण देण्याचे शासनाचे धोरण असतानाही अद्याप सदरहू १८ हजार कुटुंबियांना एसआरए योजनेचा लाभ देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, किती कालावधीत सदरहू कुटुंबियांचे शासनाकडून पुनर्वसन होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०२-२०१९) : (१), (२) व (३) रिट याचिका क्र. ३०५/९५ मध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील दिनांक ०१.०१.१९९५ पूर्वीच्या अतिक्रमकांचे उद्यानाबाहेर पुनर्वसन करण्याचे आदेश मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ०७.०५.१९९७ रोजी पारित केलेले आहेत. त्यानुसार पहिला टप्प्यातील ११६५८ व दुसरा टप्प्यातील १३४८६ असे एकूण २५१४४ अतिक्रमक प्रथमदर्शनी पात्र ठरले आहेत. सद्यस्थितीत पहिल्या टप्प्यातील ११३५९ अतिक्रमकांचे मौजे चांदिवली येथे झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत पुनर्वसन करणेत आले आहे.

दुस-या टप्प्यातील १३४८६ अतिक्रमकांच्या पुनर्वसनाकरीता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मे.डी.बी.रिॲल्टी या विकासकाची चांदिवली स्थित संघर्षनगर परिसरात सदनिका

तयार करणेकामी नेमणूक केली आहे. तथापि सदर बांधकाम मुंबई विमानतळाचे Air Funnel मध्ये येत असल्याने बांधकाम बंद करण्यात आले आहे. पुनर्वसनाकरीता पर्यायी जागा निश्चित करण्याकीरता व पुनर्वसनाची प्रक्रिया शिघ्र गतीने पुर्ण करण्याकरीता मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय सशक्तता समिती स्थापित करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

सावंतवाडी (जि. सिंधुदुर्ग) तालुक्यातील अनेक शिवारातील शेतांमध्ये वन्य प्राणी शेताची व पिकांची नासधूस करीत असल्याबाबत

(१७) ९९१३४ (२६-१२-२०१७). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी (जि. सिंधुदुर्ग) तालुक्यातील अनेक शिवारातील शेतांमध्ये हत्ती, गवा, रेडे, माकड, सांबर इत्यादी वन्य प्राणी मोठया प्रमाणात शेताची व पिकांची नासधूस करीत असल्याचे माहे नोव्हेंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाचा शासन निर्णयानुसार वन्य प्राण्यापासून आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतीच्या संरक्षणासाठी सौर उर्जेवर आधारीत तारेचे कुंपण (सोलर कुंपण) बांधण्याच्या योजनेस मान्यता देण्याबाबतचा शासन निर्णय काढला होता, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर शासन निर्णय कोकणातील शेतकऱ्यांना लागु करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांना निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर शासन निर्णय कोकणातील शेतकऱ्यांना लागु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०२-२०१९) : (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) वन्यप्राण्यांमुळे शेतपिकांचे होणारे नुकसान टाळण्याकरीता डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनेअंतर्गत लोखंडी जाळीचे कुंपण उभारण्याची योजना महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.डब्ल्यूएलपी-०५१७/प्र.क्र.९७/फ-१, दिनांक २१ मार्च, २०१८ अन्वये कार्यान्वित करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

आरे वसाहतीतील (गोरेगाव (पूर्व), मुंबई उपनगर) आदिवासी चाफ्याच्या पाडयामध्ये बिबटयाने केलेला हल्ला

(१८) ९९९३० (२६-१२-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर गोरेगाव (पूर्व), आरे वसाहतीतील युनिट क्र. १७ मधील आदिवासी चाफ्याच्या पाडयामध्ये दिनांक ३१ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास बिबटयाने दोन महिलांवर हल्ला केल्याची घटना घडली, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, बिबटयांचे वाढते हल्ले रोखण्यासाठी, पुरेशा प्रमाणात वीजेचे दिवे आणि सीसीटिव्ही बसविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०२-२०१९) : (१) व (२) दि. ३०.०९.२०१७ रोजी श्रीमती. बाईजी बेंद्रे व श्रीमती. आशा गावित रा. चाफयाचा पाडा, युनिट क्र. १७, आरे कॉलनी, गोरेगांव यांचेवर बिबटयाने हल्ला केला आहे.

सदर घटनेची चौकशी पूर्ण करण्यात आली असून, सदर चौकशीमध्ये बिबटयाने हल्ला केल्याचे निष्पन्न झाले आहे.

(३) बिबटयाचे वाढते हल्ले रोखण्यासाठी वनविभागामार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत:-

• सदर ठिकाणचे नागरीकांना ब्लिंकींग सोलर लॅम्पचे वाटप करण्यात आलेले आहेत.
• बिबटयांच्या हालचालीवर नजर ठेवण्यासाठी स्वयंचलीत ट्रॅप कॅमेरे लावण्यात आलेले आहेत.
• वन्यप्राणी विषयक घटनाबाबत कार्यवाही करण्यासाठी क्षेत्रिय कर्मचा-यांची नियमीत गस्त करण्यात येते.
• रात्री गस्तीकरिता विशेष गस्तीपथक तयार करण्यात आले आहे.
• आरे दुग्धवसाहतीमधील अतिथीगृह, कुटीर निवासस्थानाजवळ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. सदरच्या सीसीटिव्हीमध्ये बिबटयाचा वावर दिसून आल्यामुळे त्या ठिकाणी वन विभागामार्फत बिबटयाला पकडण्यासाठी कायमस्वरुपी पिंजरे ठेवण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उदभवत नाही.

राज्यातील अनाथ मुला-मुलींना आरक्षण देण्याच्या निर्णयाबाबत

(१९) १०६३१३ (१०-०४-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष

शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रथमच अनाथ मुलांना शासकीय सेवेत एक टक्का समांतर आरक्षण देण्याचा निर्णय मंत्रीमंडळाने माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या बैठकीमध्ये घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाचा लाभ राज्यातील २२ लाख अनाथ मुलांना होणार असून त्याचे पुनवर्सन आणि भवितव्य सुरक्षित होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) : (१) होय हे खरे आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

अनाथ मुलांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने व त्यांचे भवितव्य सुरक्षित करण्याच्या दृष्टीने राज्यातील अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गात शिक्षण व नोकरीमध्ये १ टक्के समांतर आरक्षण देण्याचा निर्णय मा. मंत्रिमंडळाच्या दि. १७.०१.२०१८ रोजीच्या बैठकीत घेण्यात आला असून, त्याअनुषंगाने शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र अमुजा-२०११ /प्र.क्र.२१२/का.०३ दि. ०२.०४.२०१८ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.अनाथ मुलांना दि. ०९ मे २०१८ च्या शासन निर्णयान्वये विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांच्याव्दारे अनाथ प्रमाणपत्र वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

राज्यातील वनरक्षक व वनपाल यांना तांत्रिक पदाचा दर्जा देण्याची मागणी

(२०) १०७३६५ (३१-०३-२०१८). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वनरक्षक व वनपालांना तांत्रिक पदाचा दर्जा देण्याची मागणी मा.मुख्यमंत्री व वने मंत्री यांचेकडे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली असून त्यांना सदर पदाचा दर्जा दिला नसल्याने वनरक्षकांनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान कामावर बहिष्कार टाकला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०२-२०१९) : (१) वनरक्षक-वनपालांनी जानेवारी, २०१८ मध्ये त्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याची मुख्य मागणी व इतर अनुषंगिक मागण्या मान्य न केल्यामुळे कामावर बहिष्कार टाकला होता. सदर मागण्यांमध्ये वनरक्षक व वनपालांना तांत्रिक पदाचा दर्जा देण्याच्या मागणीचा उल्लेख नाही.
(२) व (३) संघटनेनी केलेल्या वेतनश्रेणीच्या मागणीच्या अनुषंगाने राज्य शासनाने श्री. के. पी. बक्षी, सेवानिवृत्त अप्पर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीस वनरक्षक व वनपाल यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याबाबत सकारात्मक विचार करण्यात यावा, अशी शिफारस केली आहे.
(४) प्रश्न उद्भ्ावत नाही.

छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालयातील रुग्णसेवेत वाढ केल्याबाबत

(२१) १०९१०५ (०४-०४-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय वैद्यकीय आणि दंत महाविद्यालयातील औषधोचारासाठी आणि तपासणीसाठी आकारण्यात येणा-या सेवाशुल्कात दुपटीने वाढ केल्यामुळे शासनाच्या या नव्या अध्यादेशामुळे छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालयातील रुग्णसेवेचे दर दुपटीने वाढले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी औषधोपचार, तपासणी, नोंदणी शुल्कात दुपटीने वाढ व मोफत असलेल्या प्रसूतीसाठीही पैसे मोजावे लागणार असल्याने येथील रुग्ण व नातेवाईकांत तीव्र नाराजी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन गरीब रुग्णांना सवलतीत औषधोपचार मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२२-०१-२०१९) : (१) अंशत: खरे आहे. दिनांक २०.११.२०१७ च्या शासन निर्णयान्वये रुग्ण शुल्कामध्ये वाढ करण्यात आली आहे.रुग्ण शुल्कामध्ये महागाईच्या प्रमाणात प्रतिवर्षी वाढ होणे अपेक्षित आहे. तथापि शासनाने रुग्ण शुल्कात वाढ करण्याचा निर्णय ८ वर्षानी घेतलेला आहे.

(२) व (३) दारिद्रय रेषेखालील रुग्ण आणि महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेतंर्गत येणाऱ्या रु. १.५० लक्ष पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या सर्व रुग्णांना मोफत सेवा देण्यात येते.

(४) लागू नाही.

ससून रुग्णालय, पुणे येथील वाहनतळ ठेकेदार करारापेक्षा दुप्पट वाहन शुल्क वसूल करीत असल्याबाबत

(२२) ११०४७५ (१८-०४-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ससून रुग्णालय, पुणे येथे उपचारासाठी येणा-या रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून तेथील वाहनतळ ठेकेदार करारापेक्षा दुप्पट वाहन शुल्क वसूल करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करारानुसार वाहनतळा वरुन वाहन चोरीला गेल्यास नुकसान भरपाई ही या ठेकेदाराने नाकारली असून तसे पावतीवर नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदरील ठेकेदाराचा ठेका रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०२-२०१९) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) संस्थेने सदर ठेकेदाराचा ठेका दिनांक ०७.०२.२०१८ पासून रद्द केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईसह मालाड आणि आजूबाजूच्या वन जमिनीवर रहिवाश्यांच्यां निवासी पुनर्वसनाबाबत

(२३) ११०५१० (१०-०४-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह मालाड आणि आजूबाजूच्या वन जमिनीवर रहिवाश्यांचे निवासी पुनर्वसन करण्याकरिता संघर्ष नगर, चांदिवली, अंधेरी (पूर्व) येथील सरकारी जमीन मेसर्स सुमेर कॉपोरेशन या कंपनीस देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंपनीने निवासी तसेच शाळेची इमारत बांधली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लीम्बोनी विद्यानिकेतन आदिवासी नगर दत्तू कम्पाउंड, अप्पा पाडा मालाड पूर्व मुंबई ९७ या वन जमिनीवरील शाळेस इमारत देण्याकरिता वन विभागाने मुंबई उच्च न्यायालय याचिका क्रमांक ३०५/१९९५ अन्वये दिनांक १/१/१९९५ रोजी मा.कोर्टाचे आदेश असूनही फक्त निवासी पुनर्वसनाचे आदेश असतानाही संगनमताने सदर शाळा इमारत देण्याची संशयास्पद कार्यवाही करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अन्य एका शाळेचे संचालक श्री. सुब्रत राव कांबळे यांनी वन विभागाकडे शाळेकरिता जागा मागितली असता सदरजमिनीवरील पुनर्वसन इमारतीयाकेवळ वनजमिनीवरील निवासी पुनर्वसनाकरिता असल्याचे लेखी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास श्री.कांबळे आणि श्री.चौहान यांना एकाच प्रकारची मागणी असताना दोन वेगळे निर्णय आणि उत्तरे देण्याची कारणे काय आहेत,
(६) असल्यास, श्री.चौहान यासारख्या अनेक गंभीर गुन्हे दाखल असलेल्या व्यक्तीस ना हरकत देण्याची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०२-२०१९) : (१) व (२) हे खरे आहे.
(३), (४), (५) व (६) लिंबोणी विद्या निकेतन शाळेच्या वतीने सदर शाळेसाठी मौजे चांदिवली येथे भूखंड मिळणेसाठी मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र ७४२/२००६ दाखल करण्यात आली होती.

मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ७४२/२००६ मध्ये दि. ७/४/२००६ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार, वन विभागाचे निष्कर्षानुसार सदर शाळेबाबतचा विधीगव निर्णय घेणेसाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास निर्देश दिले. सदर आदेशात निर्देशित केल्याप्रमाणे सदर शाळेला पर्यायी जागा देण्यास हरकत नाही, असे वन विभागाचे अभिप्राय दिनांक १२.०५.२००६ रोजी पाठविण्यात आले होते.

रिट याचिका क्र. ७४२/२००६ मध्ये दिनांक ०७.०४.२००६ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार, लिंबोणी विद्या निकेतन या शाळेच्या पर्यायी भूखंडाबाबत कार्यवाही न झाल्याने लिंबोणी विद्या निकेतन या संस्थेने मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. ५७/२००९ दाखल केली होती. याप्रकरणी लिंबोणी निकेतन या शाळेचे इमारत क्र. १ मध्ये पुनर्वसित करणेचे आदेश मा. उच्च न्यायालयाने पारित केले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर एज्युकेशन सोसायटीचे संचालक श्री. समरतराव कांबळे यांनी दिनांक ३१.०७.२०१५ रोजी वन विभागाकडे शाळेकरीता सादर केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने त्यांना दि.०५.०३.२०१६ रोजीच्या पत्रान्वये रिट याचिका क्र.३०५/९५ मध्ये पारित झालेल्या आदेशान्वये व्यावसायिक स्वरुपाच्या अतिक्रमकांना पुनर्वसनाचा लाभ देता येत नाही असे कळविण्यात आले होते.

श्री. समरतराव कांबळे यांनी त्यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर एज्युकेशन सोसायटीचे शाळेसाठी पर्यायी जागा मिळणेकामी मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र १८८८/२०१७ दाखल केली. सदर याचिकेमध्ये दिनांक १२.१२.२०१७ रोजी प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले

आहे. प्रतिज्ञापत्रामध्ये रिट याचिका क्र.३०५/९५ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक ०७.०५.१९९७ रोजी दिलेल्या आदेशानुसार व्यावसायिक स्वरुपाच्या अतिक्रमकांना पुनर्वसनाचा लाभ देता येत नाही असे नमूद करण्यात आले आहे. तसेच लिंबोनी विद्या निकेतन शाळेला चांदिवली येथे दिलेली इमारत ही कार्यवाही चुकीची झाली आहे असे प्रतिज्ञापत्राव्दारे मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे.

माहूर (जि.नांदेड) येथील वन परिक्षेत्र अंतर्गत विविध कामात अनियमितता झाल्याबाबत

(२४) ११२०८२ (३१-०३-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहूर (जि.नांदेड) येथील वन परिक्षेत्रा अंतर्गत विविध कामामध्ये अनियमितता केल्या प्रकरणी माहे मे,२०१७ मध्ये व त्यादरम्यान तत्कालीन वन परिक्षेत्र अधिकारी श्री.एन.जी. नरोड यांना निलंबित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणातील वनपाल व इतर सहा कर्मचारी यांची सुध्दा चौकशी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात आली येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०२-२०१९) : (१) वनपरिक्षेत्र माहुर अंतर्गत विविध क्षेत्रीय कामामध्ये अनियमितता केल्या बाबत श्री.एस.जी.नरोड, वनपरिक्षेत्र अधिकारी माहूर यांना मुख्य वनसंरक्षक (प्रा.), औरंगाबाद यांच्या दि.१२.०७.२०१७ च्या आदेशान्वये निलंबीत करण्यात आले आहे.

(२), (३) व (४) क्षेत्रीय कामातील अनियमीततेबाबत महाराष्ट्र नागरी सेवा १९७९ चे नियम (शिस्त व अपील) नियम १० अंतर्गत २ वनपालांवर व २ वनरक्षकांवर दोषारोप पत्र बजावण्यात आले आहेत.

शिरढोण (जि.नांदेड) येथे वन विभागाने लावलेल्या वृक्षांना आग लागल्याबाबत

(२५) ११३०२१ (३१-०३-२०१८). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरढोण (जि.नांदेड) येथे काही दिवसापूर्वी लाखो रुपये खर्चून वन विभागाने लावलेल्या झाडांना आग लागल्याने वन संपदा नष्ट झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही कर्मचा-यांनी फायरलाईन टाकण्यात आली परंतु त्यांच्याकडे साहीत्य नव्हते यामुळे वनविभागाच्या वतीने शेतकऱ्यांना आर्थिक लाभ मिळण्याबाबत आग लावण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुषंगाने शेतकऱ्यांना आर्थिक तरतूद मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०२-२०१९) : (१) अंशत: खरे आहे.

नांदेड जिल्हयातील शिरढोण येथील वनक्षेत्रांतर्गत सन २०१६ च्या पावसाळयात २० हेक्टर रोपवन क्षेत्रामध्ये दि.३०.१२.२०१७ रोजी जाळरेषेचे काम करीत असताना रोपवन क्षेत्रास आग लागून १२ हेक्टर क्षेत्रातील रोपे जळून नुकसान झाले आहे.
(२) जाळरेषा जाळताना लागलेली आग वन कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणाने लागली असून, शेतकऱ्यांचे कोणतेही नुकसान झालेले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक लाभ मिळण्यासाठी आग लावण्यात आली, हे खरे नाही.
(३) होय.

वनरक्षक, शिरढोण व दोन वनमजूर यांना दि. ६.०१.२०१८ रोजी निलंबित केले असून संबंधित वनपाल यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी, नांदेड व सहाय्यक वनसंरक्षक यांचेकडून खुलासा प्राप्त करुन घेऊन त्यांचेवर जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

रोपवन क्षेत्र जळल्यामुळे कोणत्याही शेतकऱ्यांचे नुकसान झालेले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक तरतूद मिळण्याबाबत कार्यवाही करण्याचा प्रश्न उदभवत नाही.
(४) प्रश्न उदभवत नाही.

वनविभागातील वनरक्षक / वनपाल यांच्या वेतनसंरचनेत होत असलेला अन्याय दूर करणेबाबत

(२६) ११५१९१ (३१-०३-२०१८). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वनविभागातील वनरक्षक / वनपाल यांच्या वेतनसंरचनेत होत असलेला अन्याय दूर करणेबाबत सन १९९७ मध्ये श्री. द. म. सुकथनकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने वनविभागातील वनरक्षक / वनपाल संवर्गातील वेतनश्रेणीवर झालेला अन्याय मान्य करून सुधारित वेतनश्रेणी देण्याची शिफारस शासनाला केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास दिनांक १६-०१-२०१८ रोजी वनविभागातील वनरक्षक / वनपाल यांच्या वेतन संरचनेत सुधारणा करण्याबाबत मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सचिव (वने), वन विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे अहवाल पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०२-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४)

वनरक्षक / वनपाल यांच्या वेतन संरचनेत सुधारणा करण्याची दि.०३.०५.२०१८ रोजी बक्षी समितीसमोर विभागाद्वारे शिफारस करण्यात आली. बक्षी समितीचा अंतिम अहवाल अद्याप प्रतिक्षित आहे.

राज्यातील तीव्र पाणी टंचाईवर मात करण्यासाठी राज्यात "जलयुक्त शिवार" योजनेसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(२७) ११६७१३ (२३-०७-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.अनिल कदम (निफाड), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तीव्र पाणी टंचाईवर मात करण्यासाठी शासनाने अंमलात आणलेल्या "जलयुक्त शिवार" योजनेअंतर्गत होणा-या कामाच्या प्रस्तावास शासनाने सन २०१७-१८ व २०१८-१९ या वर्षी एप्रिल व मे महिन्यात जास्तीत जास्ती मंजूरी दिल्या, हे खरे आहे काय,
(२) अससल्यास, या योजनेसाठी आतापर्यंत किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे,
(३) असल्यास, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील उपलब्ध निधीमधील किती निधी अखर्चीत राहिला आहे,
(४) असल्यास, निधी अखर्चित रहाण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, सदर निधी खर्च करण्यासाठी शासनाने मुदतवाढ दिली आहे काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

प्रा. राम शिंदे (०६-०२-२०१९) : (१), (२), (३), (४) व (५) जलयुक्त शिवार अभियानाची सुरुवात एप्रिल महिन्यामध्ये करण्यात येते. कामे पुर्ण करण्यासाठी प्रथम सर्वसाधारणपणे एक वर्षाचा कालावधी दिला जातो सबब कामे तात्काळ सुरु करण्यासाठी सुरुवातीच्या एप्रिल, मे महिन्यामध्ये प्रशासकिय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येते.

जलयुक्त शिवार अभियान योजनेसाठी सन २०१५-१६ ते डिसेंबर २०१८ पर्यंत एकुण रू. ५६७५.०० कोटी विशेष निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात उपलब्ध करुन दिलेल्या रु.१२००.०० कोटी विशेष निधी पैकी रु.११८८.३९ कोटी निधी खर्च झाला आहे व रु.११.६१ कोटी, अखर्चित राहिला होता.

उपलब्ध करुन दिलेल्या निधीपैकी फक्त ०.९७ % निधी निविदा प्रक्रियेस अल्प प्रतिसाद,

जास्त पाऊस, शेतामध्ये उभी पिके इ. कारणामुळे अखर्चित राहिला होता.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात उपलब्ध करुन दिलल्या विशेष निधीपैकी अखर्चित निधी खर्च करण्यासाठी मुदतवाढ दिलेली नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

जे.जे. रुग्णालय, मुंबई येथे चुकीच्या पध्दतीने उपचार झाल्यामुळे बालकाचा झालेला मृत्यु

(२८) ११७५१३ (०१-०८-२०१८). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जे.जे. रुग्णालय,मुंबई येथे डॉक्टरांच्या चुकीच्या उपचार पध्दतीमुळे एका २२ महिन्यांच्या बालकाचा दिनांक ३० मार्च,२०१८ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाल्याची घटना निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालकाचा मृत्यू झाला असल्याची तक्रार जे.जे. पोलीस ठाण्यात दिनांक ४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार याबाबत दोषी असणाऱ्या संबंधित डॉक्टरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (११-०२-२०१९) : (१) अंशत: खरे आहे. जे.जे. रूग्णालयात दि.१/४/२०१८ रोजी २२ महिन्याच्या बालकाचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला आहे.

(२) नाही.

(३) रूग्णाच्या वडिलाकडून प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने रूग्णालय प्रशासनाकडून चौकशी करण्यात आली आहे.

(४) चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालानुसार संबंधित रूग्णावर रूग्णालयीन चिकित्सा पद्धतीप्रमाणे सर्व प्रकारचे आवश्यक उपचार करण्यात आले असल्याचे समितीला आढळून आले आहे. त्यामुळे डॉक्टरावर कारवाई करण्याची बाब उद्भवत नाही.

(५) लागू नाही.

गाळयुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार या योजनेंतर्गत रायगड जिल्हयातील जलस्त्रोतांमधील गाळ काढण्याबाबत

(२९) ११७७२५ (२०-०७-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गाळयुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार या योजनेंतर्गत रायगड जिल्हयातील १ हजार ५० जलस्त्रोतांमधील गाळ पावसाळयापूर्वी काढण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, ज्या शेतक-यांना आपल्या शेतात ही गाळयुक्त माती टाकण्याकरिता मागणी केली असेल त्यांच्याकडून रॉयल्टी घेण्यात येणार नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे (०८-०२-२०१९) : (१) अंशत: खरे आहे.

गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेस शासन निर्णय दि.०६ मे, २०१७ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. या योजनेतील तरतूदीनुसार राज्यातील २५० हेक्टर पेक्षा कमी लाभक्षेत्र असलेल्या धरणामधील गाळ काढून तो शेतामध्ये वापरण्यासाठी शेतकऱ्यांनी मागणी केल्यास त्यास नियमानुसार मान्यता देण्यात येते. या योजनेमध्ये रायगड जिल्हयातील काही जलस्त्रोतांचा देखील समावेश आहे.

(२) होय.

(३) सदर गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार हया योजनेमध्ये शेतकऱ्यांनी संबंधित तहसिलदार यांचेकडे मागणी अर्ज करणे आवश्यक आहे.असे अर्ज प्राप्त झाल्यावर त्यास तालुकास्तरीय समितीमार्फत प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उदभवत नाही.

नांदेड जिल्हयात महिला लोकशाही दिवशी महिलाकडून तक्रारी प्राप्त झाली नसल्याबाबत

(३०) ११८५२२ (२५-०७-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महिलांच्या विविध तक्रारीचे निरसन करण्यासाठी दर महिन्याच्या तिस-या सोमवारी महिला लोकशाही दिन साजरा करण्यात येतो परंतु नांदेड जिल्हयात मागील दोन वर्षापासून एकही तक्रार आली नसल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी हे महिला लोकशाही दिनाच्या अध्यक्ष स्थानी तर मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी (वरिष्ठ महिला) हे सदस्य म्हणून तर जिल्हा

महिला व बालविकास अधिकारी हे सदस्य सचिव म्हणुन काम पाहतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नांदेड शहरात मागील दोन वर्षात या संदर्भात एकही तक्रार दाखल न झाल्याने या महिला लोकशाही दिनाबाबत शंका निर्माण झाली असल्याने याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार शासनाने आवश्यक ती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०८-०२-२०१९) : (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईत वन क्षेत्र जमीनीची होत असलेली घट

(३१) १२०९०५ (३०-०७-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील सुमारे १ हजार हेक्टर वन क्षेत्राची जमीनची घट झाली असून त्यापैकी ९०० हेक्टर जमीन ही केवळ आरे दुग्ध वसाहतीमधील असल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई शहरात घटते वन क्षेत्र, खारफुटी क्षेत्र, शेकडो वर्षापूर्वीची जुने महाकाय वृक्षांची कत्तल आणि उद्यान क्षेत्राचे कमी होत असलेले प्रमाण विचारात घेता, विकासाच्या नावाखाली मुंबईचे बैंगलोर होऊ देऊ नका असा इशारा वनशक्तीचे संचालक डी. स्टॅलिन यांनी राज्य शासनास दिला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, मुंबई शहरात शुध्द खेळती हवा निर्माण होऊन पर्यावरणाचा समतोल रहावा या दृष्टीने महत्वाचा भाग असलेले वन क्षेत्राचे घटते प्रमाण रोखून त्याचा विस्तार करण्याच्या दृष्टीने शासनाने उपाय योजना करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०२-२०१९) : (१) हे खरे नाही.
आरे दुग्ध वसाहतीमधील जमिन ही शासनाने दुग्ध व्यवसायाच्या उद्देशासाठी शासनाच्या दुग्धव्यवसाय विकास विभागासाठी संपादित केलेली आहे. सदर जमिनीवर वन क्षेत्र म्हणून आरक्षण नाही.
(२) हे खरे नाही.

सन २०१७ च्या वन सर्वेक्षण संस्था, डेहराडुन यांच्या अहवालानुसार राज्यातील कांदळवन क्षेत्रामध्ये सन २०१५ च्या तुलनेत ८२ चौ.कि.मी. एवढी वाढ झाल्याचे नमूद करण्यात आले आहे.

(३) व (४) सन २०१७ ते २०१९ या वर्षामध्ये दरवर्षी जून-जुलै महिन्यात वृक्ष लागवड करुन एकूण ५० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट शासनाने ठेवले आहे.

१. राज्यातील कांदळवानाचे संरक्षण व संवर्धन करण्याकरिता शासनाने कांदळवन कक्षाची निर्मिती केली आहे.

२. जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सागर तटीय समिती गठीत करण्यात आलेली आहे.

३. राज्य स्तरावर कांदळवन संधारण व सागर जैवविविधता प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आली असून त्याव्दारे सागरी व किनारी जैवविविधता व कांदळवन संधारणाचे उपक्रम तयार करुन राबविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ जिल्हयातील पैनगंगा अभयारण्यातील रस्त्यासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत

(३२) १२०९४५ (३०-०७-२०१८). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील पैनगंगा अभयारण्यातील रस्त्यासाठी विशेष बाब म्हणून निधी उपलब्ध करुन देण्यासाठी दिनाक १७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास विशेष कार्य अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय यांनी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना लेखी पत्र दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०२-२०१९) : (१) पैनगंगा अभयारण्यातील रस्त्यासाठी विशेष बाब म्हणून निधी मिळणे या विषयाबाबत दिनांक ०८.०८.२०१७ रोजी मा. सचिव (वने) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली असून सदर बैठकीस मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, पेंच व्यघ्र प्रकल्प, नागपूर यांना व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे उपस्थित राहण्याबाबत दिनांक ०४.०८.२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

(२) व (३) पैनगंगा अभयारण्यातील ३ रस्त्यांच्या देखभाली व दुरस्तीच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अंदाजित रु. १७९.९३ लक्षच्या किंमतीचे कामांना मंजूरी देण्यात आली असून सदर कामे प्रगती पथावर आहेत.

(४) प्रश्न उदभवत नाही.

उमरखेड (जि.यवतमाळ) येथील स्व.उत्तमराव पाटील, वन उद्यान या प्रकल्पाच्या प्रस्तावास वाढीव निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

(३३) १२०९४८ (३०-०७-२०१८). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) येथील स्व.उत्तमराव पाटील, वन उद्यान या प्रकल्पाच्या प्रस्तावास वाढीव निधी उपलब्ध करुन देणेबाबत योग्य ती कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याचे आदेश अवर सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय यांनी प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, पुणे यांना दिनाक ४ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या आदेशानुसार अद्यापही कोणतीच कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०२-२०१९) : (१) होय. हे खरे आहे.

तथापि, मंजूर DPR नुसार उमरखेड (जि. यवतमाळ) येथील स्व. उत्तमराव पाटील व उद्यानाची कामे सन २०१५-१६ ते २०१८-१९ करीता सुरु आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

मंजूर DPR नुसार वन उद्यानाची कामे सुरु असल्यामुळे विलंबाचा प्रश्न उदभवत नाही.

टाकळी (निमकर्दा) (ता.बाळापूर,जि.अकोला) या गावात मृद व जलसंधारणासाठी मंजूर निधीचा वापर न झाल्याबाबत

(३४) १२२५८६ (२३-०७-२०१८). श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाकळी (निमकर्दा) (ता.बाळापूर, जि.अकोला) या गावात तीव्र पाणीटंचाईमुळे जलयुक्तशिवार योजनेचे सुद्धा काम झाले नसल्याने जिल्हा वार्षिक योजना सन २०१७-२०१८ मध्ये मृद व जलसंधारणासाठी रुपये पाच कोटी निधी मंजूर केला असून यातून काही निकडीची कामे करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हा कृषि आधिकारी, अकोला यांना प्रस्तावित केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकडे प्रशासनाने दुर्लक्ष करून स्थानिक लोकप्रतिनीधीनी प्रस्तावित केलेल्या कामाची तपासणी व अंदाजपत्रकात समावेश केला नसल्याने प्रस्तावा अभावी निधी शासनाला वर्ग झाल्याची बाब माहे फेब्रुवारी मध्ये निदर्शनास आल्यामुळे त्यासंदर्भात मा. मंत्री महोदयांकडे तक्रार केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार सदर दुष्काळ सदृश भागामध्ये मृद व जलसंधारणासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रस्तावित केलेल्या कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे (०६-०२-२०१९) : (१) व (२) हे खरे नाही.

जलयुक्त शिवार अभियान सन २०१५-१६ मध्ये टाकळी निमकर्दा ता. बाळापुर जि.अकोला या गावात प्रस्तावित केल्याप्रमाणे एकुण १६ कामे पुर्ण करण्यात आलेली आहेत.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात महसूल विभागाने त्याच्या ताब्यात घेतलेल्या वनजमिनी वनविभागास परत केल्या नसल्याबाबत

(३५) १२४२३५ (३०-०७-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.सुभाष साबणे (देगलूर) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महसूल विभागाने १४ एप्रिल, १९७६ पासून विविध कामांसाठी त्याच्या ताब्यात घेतलेल्या वनजमिनी परत केल्या नसून त्या वनजमिनींचे परिक्षण प्रधान महालेखाकार करणार असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महसूल विभागाच्या ताब्यात असलेली आठ लाख हेक्टर वनजमिन परत करण्यासाठी राज्याच्या वनविभागाचे तत्कालिन प्रधान सचिव यांनी दिनांक २ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास आदेश जारी केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू जमिनी महसूल विभागाकडून ताब्यात घेण्याबाबत वन विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०२-२०१९) : (१) व (२) प्रधान महालेखाकार यांच्या परिक्षणाबाबत पत्र व्यवहार आढळून आलेला नाही. तथापि, महसूल विभागाच्या ताब्यात असलेल्या वनजमीनी महसूल विभागाने वन विभागाच्या ताब्यात द्याव्यात, असे निर्देश शासन परिपत्रक क्रमांक एलएलडी-१०७६/२१८६-जी-१, दिनांक १४ एप्रिल, १९७६ अन्वये देण्यात आलेले आहेत. त्याअनुषंगाने या विभागाच्या दिनांक २/१२/२०१६ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये संबंधित जिल्हाधिकारी यांनी महसूल विभागाच्या ताब्यातील वनक्षेत्रापैकी अतिक्रमण विरहीत वनक्षेत्र वन विभागास परत करण्यासाठी कालमर्यादा ठरवून दिलेली आहे.
(३) उपरोक्त शासन परिपत्रकान्वये संबंधित जिल्हाधिकारी यांनी अतिक्रमण विरहीत वनक्षेत्र वन विभागाचे ताब्यात देण्यासाठी आवश्यक ते आदेश पारीत करण्याचे कार्यवाही त्यांच्या

स्तरावर करावयाची असून त्यांनी आदेशात केलेल्या क्षेत्राचा ताबा वन विभागाकडे घेण्यात येतो. महसूल विभागाकडून आजतागायत १,३३,५१४.८४ हेक्टर आर. इतके क्षेत्र वन विभागाच्या ताब्यात घेण्यात आले आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

रायगड जिल्हा परीषदेच्या लघु पाटबंधारे विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

(३६) १२६५६७ (०४-१२-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यशासनाच्या जलसंधारण विभागाने रायगड जिल्हा परिषदेमध्ये स्वतंत्र लघु पाटबंधारे विभाग सुरू करण्याची मान्यता देऊन दिड वर्षाचा कालावधी होउनसुध्दा अद्यापपर्यंत आवश्यक अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती केली नसल्यामुळे अनेक विकास कामांवर त्याचा परिणाम होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हा परिषदेमध्ये पाणी पुरवठा विभागात मंजूर ५० पदांपैकी २१ पदे रिक्त असून रिक्त पदांचा भार कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचा-यांवर येत असून जलयुक्त शिवार योजनेतील जलसंधारणाच्या कामांचाही अतिरिक्त भार कर्मचारी व अधिका-यांवर येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लघु पाटबंधा-यांची कामे ग्रामीण पाणी पुरवठा विभागालाच करावी लागत असल्यामुळे अपु-या कर्मचारी वर्गामुळे जलयुक्त शिवार योजनेच्या कामांवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार रायगड जिल्हापरिषदेच्या लघु पाटबंधारे विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे (२८-०१-२०१९) : (१), (२), (३), (४), (५) व (६) दिनांक ३१.५.२०१७ च्या शासन निर्णयान्वये मृद व जलसंधारण आयुक्तालयाच्या स्थापनेसह क्षेत्रिय यंत्रणेची फेररचना करण्यात आली आहे. फेररचनेअंतर्गत २ तालुक्यांसाठी १ उपविभाग याप्रमाणे १७५ जिल्हा परिषद, लघु पाटबंधारे, उपविभाग निर्माण करण्याची कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त कार्यालयाकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. सर्व आयुक्त कार्यालयाचे प्रस्ताव प्राप्त होताच उपरोक्तप्रमाणे २ तालुक्यासाठी १ उप उपविभागाची निर्मिती करण्यात येईल. सद्य:स्थितीत उपलब्ध असलेल्या अधिकारी/ कर्मचा-यांना अतिरिक्त कार्यभार सोपवून कामे करण्यात येत आहेत. समावेशनाने/ बदलीने/पदोन्नतीने/सरळसेवेने जसजसे अधिकारी/कर्मचारी उपलब्ध होतील तसतसे रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

बालहक्क आयोगाचे बालकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष होत असल्याबाबत

(३७) १२६५७४ (०५-१२-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जयकुमार गोरे (माण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बालकांच्या हक्कासाठी असलेल्या महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग बालकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करीत असून सन २०१५ ते २०१८ या ३ वर्षाच्या कालावधीत २८० पैकी फक्त ३३ तक्रारींवर निर्णय घेण्यात आला असल्याची गंभीर बाब माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तक्रारीमध्ये शिक्षण अधिकारापासून ते लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणांचा समावेश असून न्यायालयापेक्षाही उशिरा न्याय देण्याचे काम आयोग मागील अनेक वर्षापासून करत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, आयोगाच्या अध्यक्षांनी खर्चासाठी मागणी केलेल्या रकमेपैकी ५०% हून कमी निधी शासनाने दिला असून मागणी केलेल्या कर्मचाऱ्यांपैकी निम्म्याच कर्मचारी वर्गास मान्यता दिल्याने सुमारे ५० लाखाहून अधिक रकमेचा धनादेश आयोगाने शासनास परत केल्याचे ही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, शासनाने महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाकडे प्रलंबित असलेल्या तक्रारीचे निराकरण करण्यासह आयोगास मंजूर केलेला पूर्ण निधी व कर्मचारीवर्गास मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) : (१) होय.

(२) होय.

(३) व (४) बाल हक्क संरक्षण आयोगास सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात ८८.२१ लाख इतका निधी उपलब्ध करण्यात आला होता.

परत करण्यात आलेला धनादेश RTE अंतर्गतच्या निधीचा होता. RTE अंतर्गतचा रु. ६१.०० लक्ष निधी माहे ५ डिसेंबर २०१८ रोजी प्राप्त झाला होता. उर्वरित कालावधी कमी असल्याने रुपये ६१.०० लाखांपैकी रुपये २.३५ लाख खर्च झाले व उर्वरित रक्कम रुपये ५८.६५ लाख समर्पित करण्यात आली.

(५) आयोगातील मंजूर एकूण १२ पदांपैकी उदा. सचिव, प्रशासकीय अधिकारी, विधी सल्लागार, सहायक प्रशासकीय अधिकारी तथा लेखाधिकारी, परिविक्षा अधिकारी अशी महत्त्वाची ८ पदे भरण्यात आलेली असून वर्ग ३ व ४ ची चार पदे रिक्त आहेत.
सन २०१८-१९ मध्ये आयोगास एकूण १०,३८६,०००/- फक्त (रुपये एक कोटी तीन लाख शहाऐंशी हजार फक्त) एवढा निधी अर्थसंकल्पीत असून सदर निधी शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग दि. २५ एप्रिल, २०१८ व दि. २८ जानेवारी, २०१९ अन्वये वितरीत करण्यात आलेला आहे.
(६) लागू नाही.

मुंबईतील तिवरांची कत्तल रोखण्यासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्याबाबत

(३८) १२६७८० (०७-१२-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.जयकुमार गोरे (माण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईच्या समुद्रासह खाडी क्षेत्रातील तिवरांची कत्तल दिवसागणित वाढतच असून तिवरांचे संरक्षण करण्यासाठी शासनाकडून अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईत होणारी तिवरांची बेसुमार कत्तल रोखण्यासाठी मुख्य वन संरक्षक दर्जाचा अधिकारी व ३७ कर्मचा-यांचे स्वतंत्र युनिट स्थापन करण्याचा प्रस्ताव वनखात्याच्या विचारधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईतील तिवरांची बेसुमार कत्तल रोखण्यासाठी स्वतंत्र युनिट स्थापन करण्याबाबत तातडीने निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०२-२०१९) : (१) हे खरे नाही, भारतीय वन सर्व्हेक्षण संस्थेच्या भारतीय वन स्थिती अहवाल, २०१७ अनुसार राज्यातील कांदळवन क्षेत्रामध्ये सन २०१५ च्या तुलनेत ८२ चौ.कि.मी. ने वाढ झाल्याचे नमूद करण्यात आलेले आहे.
(२), (३) व (४) राज्यातील तटीय क्षेत्रातील कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करण्याकरिता सन २०१२ मध्ये तत्कालीन मुख्य वनसंरक्षक या दर्जाच्या अधिकारी यांच्या अधिपत्याखाली ३७ कर्मचाऱ्यांसह कांदळवन कक्षाची निर्मिती करण्यात आली.

तसेच, सन २०१३ मध्ये मुंबई व मुंबई उपनगरातील कांदळवनांचे प्रभावीपणे संरक्षण करण्याच्या दृष्टीने विभागीय वन अधिकारी यांच्या अधिपत्याखाली ३० कर्मचाऱ्यांसह मुंबई कांदळवन संधारण घटकांची निर्मिती करण्यात आली आहे.

चंद्रपूर शहरातील बाबुपेठ येथील स्नेहदीप बालगृहात मुलीवर झालेला अत्याचार

(३९) १२७३२६ (०६-१२-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहरातील बाबुपेठ येथील स्नेहदीप बालगृहाची जिल्हा बाल कल्याण समितीने पाहणी केली असता एका अल्पवयीन निराधार मुलीवर तेथील काळजीवाहक कर्मचा-याने अत्याचार केल्याची घटना दिनांक ०५ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बालगृहात असलेल्या इतर मुलींवरही अत्याचार झाला असल्याचा संशय जिल्हा बाल कल्याण समितीने व्यक्त केला असून याबाबतचा अहवाल बाल संरक्षण पथकाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार या प्रकरणात दोषी असलेल्या संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) : (१) होय.

(२) व (३) नाही. असा कोणताही अहवाल जिल्हा बाल कल्याण समितीने बाल संरक्षण कक्षाकडे सादर केलेला नाही.

तथापि, स्नेहदीप बालगृहात एका अल्पवयीन निराधार मुलीवर तेथील काळजीवाहक कर्मचाऱ्याने अत्याचार केल्याबाबतच्य प्रकरणी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, चंद्रपूर यांनी तपासणी केलेली आहे. अपराधी कर्मचाऱ्याविरुध्द रामनगर पोलीस ठाणे, चंद्रपूर येथे भादवि कलम ३७६ (२) (एफ) (जे) (के), ३७६ (३), ३५४ (अ) (२), ५०६ सहकलम ६, १०, १२, बाल लैंगिक अत्याचार संरक्षण अधिनियम २०१२ नुसार गुन्हा अपराध क्र. ८९२/२०१८ नोंदविण्यात आलेला असून सदर आरोपी सद्यस्थितीत कारागृहामध्ये आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

एकल पालक योजनेचा लाभ मराठवाडयातील आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या पाल्यांना मिळत नसल्याबाबत

(४०) १२८४७८ (०५-१२-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कर्जबाजारी आणि नापिकी यामुळे होत असलेल्या शेतक-यांच्या आत्महत्या तसेच शासकीय योजना असूनही महिला व बालकल्याण विभागाने केवळ बंदी पाल्यांनाच एकल पालक योजनेतील मासिक अनुदानाच लाभ मिळत असून तसेच अपुरा निधी मिळत असल्यामुळे एकल पालक योजनेचा लाभ मराठवाडयातील आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या शिक्षण घेणाऱ्या पाल्यांना मिळत नसल्याचे दिनांक २३ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या मुलांना शासकीय लाभापासून वंचित ठेवणा-या संबंधितांवर कारवाई करण्यासह या योजनेचा लाभ मराठवाडयातील आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या पाल्यांना मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) : (१) नाही,

शासन निर्णय दिनांक ९ ऑक्टोबर, २०१३ रोजी मधील तरतूदीनुसार बालसंगोपन योजनेच्या पा. लाभार्थ्यांची निवड संबंधित जिल्हयाच्या बाल कल्याण समितीच्या आदेशान्वये होते.

बाल कल्याण समितीने दिलेल्या दाखल आदेशा नुसार लाभार्थ्यांना अनुदान देणेसाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या मागणीनुसार बालसंगोपन योजनेचा लाभ प्रदान करण्यासाठी आवश्यक तरतूद उपलब्ध करण्यात आली आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भ्ावत नाही.

कामराज नगर (घाटकोपर, मुंबई) येथील परिसरातील तिवरांची कत्तल करून झोपड्या उभारण्यात येत असल्याबाबत

(४१) १२९२२८ (०७-१२-२०१८). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कामराज नगर (घाटकोपर, मुंबई) परिसरातील कोकण वैभव चाळीलगत खाडीच्या जागेवर तिवरांची (कांदळवन) कत्तल करून भूमाफियांकडून सर्रासपणे झोपडयांची उभारणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी काही रहिवाशांनी सातत्याने जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे, घाटकोपर पोलीस ठाणे तसेच मुंबई महानगरपालिकेच्या एन वॉर्ड कार्यालयात तक्रारी केल्या असतानाही त्यांच्याकडून आजमितीस कोणतीही कारवाई होत नसल्याने दिवसेंदिवस या झोपडया वाढतच आहेत तसेच तक्रारी करणाऱ्या रहिवाशांना खोटया गुन्हयात वा जिवे मारण्याची धमकी भूमाफीयांकडून मिळत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील खारफुटीच्या क्षेत्रात होणाऱ्या अतिक्रमणाविरूद्ध तसेच बेकायदा बांधकामाविरोधात सन २००५ साली मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विविध याचिकांची एकत्रित सुनावणी घेवून न्यायमुर्ती श्री. अभय ओक आणि न्यायमुर्ती श्री.आर. आय.छगला यांच्या खंडपीठाने दिनांक १७ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास खारफुटीच्या क्षेत्रात बांधकामे करण्यास बंदी घातली तसेच खारफुटीच्या ५० मिटरच्या परिसरात बेकायदा बांधकामे झाल्यास त्यावर कारवाई करण्यात यावी असे आदेशही खंडपीठाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू आदेशाला अनुलक्षून उपरोक्त बांधण्यात आलेल्या अनधिकृत झोपडया विनाविलंब निष्कासित करण्यासह यास जबाबदार असणाऱ्यांविरोधात जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०२-२०१९) : (१) व (२) मौजे घाटकोपर न.भु.क्र. १९४ ब, सर्व्हे क्र. २३६ पै. या परिसरात अतिक्रमण होत असल्याबाबत स्थानिकांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या.

मौजे घाटकोपर न.भु.क्र.१९४ ब सर्व्हे क्र. २३६ पै. मध्ये अनधिकृत २२ झोपड्या आढळून आलेल्या होत्या. सदर झोपड्यांचे दिनांक ११.१.२०१७ रोजी निष्कासन करण्यात आले.

सदर क्षेत्रामध्ये फेब्रुवारी/मार्च २०१८ दरम्यान पुन्हा अतिक्रमण करण्याचा प्रयत्न निदर्शनास येताच दिनांक २६, २७, २८ एप्रिल, २०१८ रोजी महसूल विभाग, पोलीस विभाग, मुंबई महानगरपालिका यांनी संयुक्तपणे निष्कासनाची मोहिम राबवून सदर जागेवरील २०७ झोपड्या निष्कासित करण्यात आल्या आहेत.
(३) मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. ८७/२००६ मध्ये दिनांक १७.९.२०१८ रोजी अंतिम आदेश पारित केले आहेत. सदर आदेशामध्ये कांदळवन क्षेत्र व कांदळवनाच्या लगत ५० मीटर लगतच्या क्षेत्रात बांधकामाला प्रतिबंधित करण्यात आलेले आहे. असे क्षेत्र निश्चित करुन नियोजन प्राधिकरणाने त्यांच्या नियोजन आराखड्यामध्ये दर्शविण्यात यावेत असे मा. उच्च न्यायालयाने आदेशात नमूद केले आहे.
(४) व (५) वन विभागाच्या ताब्यातील क्षेत्रामध्ये अनधिकृत अतिक्रमणाविरुद्ध वन गुन्ह्यांची नोंद करुन भारतीय वन अधिनियम, १९२७ अंतर्गत कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच इतर कांदळवन क्षेत्रात देखील अतिक्रमणाविरुद्ध संबंधित विभागाला अतिक्रमण निष्कासन करण्याकरिता सहकार्य वन विभागाकडून करण्यात येत आहे.

मौ.सोनाळे (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील महादेव दिंडेश्वर मंदिर परिसरातील वन जमिनीमधील बांधकाम तोडण्यासंदर्भात

(४२) १२९२७० (०६-१२-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ. सोनाळे (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील राखीव वन क्र.नं १०३६/स.क्र. २२७ येथे पर्यटन स्थळ असलेल्या महादेव दिंडेश्वर मंदिर परिसरातील पत्र्याचे शेड व मंदिर क्षेत्र ११८१.४१ चौ.मी. व गोशाळा ८९.२० चौ.मी. हे वन जमिनीवर असलेले बांधकाम तोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मंदिर पुरातन असून अनेक भाविकांचे श्रध्दास्थान असल्याने या आदेशा विरोधात भाविकांच्या भावना तीव्र झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मंदिराशेजारी अन्य अनधिकृत बांधकाम असून त्यावर कारवाई न करता केवळ भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या पुरातन महादेव दिंडेश्वर मंदिराच्या परिसरात असलेल्या बांधकाम तोडण्याची कार्यवाही करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, त्यानुसार भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या पुरातन महादेव दिंडेश्वर मंदिराचे बांधकाम तोडण्याचे आदेश रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०२-२०१९) : (१) मौजे सोनाळे (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील राखीव वन कं.नं. १०३६ सर्व्हे क्र. २२७ मध्ये महादेव दिंडेश्वर मंदीर परिसरामध्ये वन जमिनीवर ११८१.४१ चौ.कि.मी. क्षेत्रावर मंदीर क्षेत्र व पत्र्याचे शेड त्याचप्रमाणे ८९.२० चौ.कि.मी. क्षेत्रावर गोशाळा बांधकाम करुन अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १, ३५, ३६/२००७ मध्ये पारित केलेल्या आदेशानुसार सदर अतिक्रमण काढून टाकण्यासाठी अतिक्रमणधारकांना वनक्षेत्रपाल, पडघा यांच्यामार्फत दिनांक २५.९.२०१८ रोजी नोटीस बजावण्यात आली आहे.
(२) वनक्षेत्रपाल, पडघा यांच्यामार्फत दिनांक २५.९.२०१८ रोजी बजावलेली नोटीस मंदिरासाठी नसून मंदिर परिसरातील नव्याने बांधलेला पत्र्याचे शेड व मंदिर क्षेत्र (११८१.४१ चौ.मी.) व गोशाळा (८९.२० चौ.मी.) हे वनजमिनीवरील अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याकरिता आहे.
(३), (४) व (५) उपरोक्त नमूद मंदिर परिसरातील बांधकामासहित इतर वनजमिनीवर अनधिकृत बांधकाम केलेल्या इतर अतिक्रमणधारकांना देखील अतिक्रमण हटविण्यासंदर्भात नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत.
(६) प्रश्न उद्भ्ावत नाही.

राज्यातील हरितपट्याचे संवर्धन करण्यासंदर्भात

(४३) १२९५८२ (०६-१२-२०१८). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील हरितपट्याचा झपाट्याने होणारा ऱ्हास थांबवून त्याच्या संवर्धनासाठी खाजगी वन जमीनी आरक्षित वने म्हणून जाहिर करण्याचा आणि त्यावर हक्क सांगण्याचा राज्य सरकारचा निर्णय योग्य असल्याचा निर्णय मा.मुंबई उच्च न्यायालयाने नाहर बिल्डरसह राज्यभरातील १७६ व्यावसायीकांनी दाखल केलेल्या याचिकेविरोधात दिनांक २७ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयामुळे राज्यातील किती हजार हेक्टर खाजगी वन जमिन सुरक्षित राहणार आहे,

(३) असल्यास, हरितपट्यावर बांधकाम व्यवसायिकांनी केलेली बांधकामे निष्कासित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०२-२०१९) : (१) होय हे खरे आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयातील मेसर्स गोदरेज ॲन्ड बॉईस प्रा.लि. या प्रकरणात दिनांक ३०.१.२०१४ रोजी दिलेल्या निर्णयाच्या आधारे श्री.रोहन विजय नाहर व इतर १७४ याचिकाकर्त्यांनी त्यांच्या जमिनीसंदर्भात खाजगी वनांच्या नोंदी रद्द करण्यासाठी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या. सदर याचिकांपैकी १७२ याचिका मा.उच्च न्यायालयाने दिनांक २७.९.२०१८ च्या निर्णयाव्दारे खारीज केल्या आहेत व ३ यांचिकांमध्ये निर्णय राखून ठेवले आहेत.

(२) उक्त निर्णयामुळे महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ च्या प्रभावाखालील राज्यातील जवळपास २.७० लाख हे. जमिन सुरक्षित राहणार आहे.

(३) व (४) मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २५.१.२०१० रोजी दिलेल्या निर्णयानुसार जी संपादीत खाजगी वने महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ च्या कलम-२२अ खाली पुन:स्थापित झाली आहेत किंवा कलम-६ खाली पुन:स्थापित झाली आहे, अशा जमीनीवरील झालेले बांधकामे वगळता इतर प्रकरणातील जमिनीचे सर्वेक्षण, सिमांकन करुन त्या जमिनींचे अभिलेख यथास्थित करुन त्या क्षेत्रावर रोपवन घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

माकेगाव (ता.रेणापूर जि.लातूर) येथील साठवण तलावास मंजुरी देण्याबाबत

(४४) १२९६०८ (०४-१२-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माकेगाव (ता.रेणापूर जि.लातूर) येथील साठवण तलाव प्रकल्पास मंजुरी देण्याबाबतची मागणी लातूर ग्रामीण स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.जलसंधारण मंत्री व जलसंपदा मंत्री यांच्याकडे सन २०१७ मध्ये निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे मा.जलसंधारण मंत्री यांनी स्थानिक लोकाप्रतीनिधीना माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान लेखी पत्राद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाचे सर्वेक्षण व अन्वेषण हाती घेऊन प्रशासकीय मान्यता देण्याबाबत व सदर साठवण तलावास पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

प्रा. राम शिंदे (०५-०२-२०१९) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) राज्य जल परिषदेकडून मंजूर झालेल्या गोदावरी खोरे एकात्मिक राज्य जल आराखड्यानुसार मनार खोऱ्यामध्ये पाणी उपलब्ध नसल्याने पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त होत नाही. त्यामुळे सद्यस्थितीत या तलावाचा पाणी उपलब्धता प्रस्ताव लातूर विभागीय कार्यालयाने तात्पुरता स्थगित ठेवला आहे.

प्रकल्पास पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय प्रकल्पाचे सविस्तर क्षेत्रिय सर्वेक्षणाचे काम हाती घेणे शक्य नाही. तसेच पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय प्रशासकीय मान्यता प्रस्ताव सादर करता येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

हिवरखेडा (ता. सेनगाव, जि हिंगोली) याठिकाणी वृक्षारोपण कामात झालेला गैरव्यवहार

(४५) १३०५४४ (०६-१२-२०१८). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिवरखेडा (ता. सेनगाव, जि हिंगोली) याठिकाणी पावसा आभावी वनविभागा मार्फत वृक्षारोपण केलेली काही झाडे वाळली असल्याने शासनाचे लाखो रुपयाचे नुकसान वन विभागाच्या निष्काळजीपणामुळे झाले असल्याचे माहे ऑगस्ट २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वृक्षारोपण करण्यासाठी जास्त खोल खड्डे करण्याची आवश्यक असूनही वन विभागाने याकडे दूर्लक्ष केले असल्याने या प्रक्रियेत गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वृक्षारोपण प्रक्रियेत दुर्लक्ष करणा-या संबधितावर कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी तेथील निसर्गप्रेमी व जनतेनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार याबाबत जबाबदार असण्याऱ्या संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०२-२०१९) : (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

हिंगोली वन विभागामार्फत हिवरखेडा ता. सेनगांव जि.हिंगोली या ठिकाणी वृक्षारोपणाची कामे करण्यात आलेली नाही. त्यामुळे गैरव्यवहार होण्याचा प्रश्न उदभवत नाही

(५) प्रश्न उदभवत नाही.

उदगीर व जळकोट (जि.लातूर) तालुक्यात नवीन साठवण तलाव निर्माण करण्यासाठी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मिळण्याबाबत

(४६) १३०७९३ (०६-१२-२०१८). डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर व जळकोट (जि.लातूर) तालुक्यात दुष्काळजन्य परिस्थिती असल्याने या दुष्काळी भागात नव्याने साठवण तलाव निर्माण करण्यासाठी अनेक साईट स्थळ उपलब्ध असल्याने या तालुक्यात पाणी उपलब्धता प्रमाणपत्र जलविज्ञान विभागाकडून मिळवून द्यावे यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी मागणी करूनही पाणी उपलब्धता प्रमाणपत्र दिले जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उदगीर व जळकोट तालुक्यात नवीन साठवण तलाव निर्माण करण्यासाठी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे (०५-०२-२०१९) : (१) व (२) अंशत: खरे आहे.

सदरील प्रकल्प लेंडी प्रकल्पावर स्थित आहे. राज्य जल परिषदेकडून मंजूर झालेल्या गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखड्यानुसार लेंडी खोऱ्यामध्ये लेंडी प्रकल्पावर पाणी उपलब्ध नसल्याने पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त होत नाही. त्यामुळे सदर प्रस्ताव स्थगित करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

देऊळगावराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील अति दुर्गम भागातील गावांचा आदर्श गाव निवडी संदर्भातील प्रस्ताव

(४७) १३२३६० (१०-१२-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगावराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील अति दुर्गम भागातील मौजे धानोरा या गावांचे आदर्श गाव निवडी संदर्भातील प्रस्ताव कार्यकारिणीकडे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे (०८-०२-२०१९) : (१) होय. हे खरे आहे.

(२) व (३) मौजे धानोरा (बुटट व निमखेड) या गावाचा प्रस्ताव राज्यस्तरीय कार्यकारी समितीकडे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, बुलढाणा यांचेकडून जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्या शिफारशीने प्राप्त झाला होता. सदर गावास दिनांक २८/६/२०१८ रोजी भेट देऊन राज्य कार्यकारी समितीने दिनांक १४/९/२०१८ रोजी प्राथमिक मंजूरी दिली आहे.

गडचिरोली जिल्हयातील वनपरिक्षेत्रात जलशिवार योजनेच्या कामामध्ये झालेला गैरव्यवहार.

(४८) १३२८२० (०७-१२-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चामोर्शी (जि.गडचिरोली) तालुक्यातील मार्कंडा (कनसोबा) व घोट वनपरिक्षेत्रात सन २०१४-१५, २०१५-१६, २०१६-१७ या वर्षामध्ये जलयुक्त शिवार योजना आणि महात्मा गांधी रोजगार हमी योजना तसेच महाराष्ट्र रोजगार हमी योजना आणि पर्यटन क्षेत्रातंर्गत प्राप्त झालेल्या निधीमधून करण्यात आलेली अनेक कामे ही नित्कृष्ट दर्जाची झालेली असून त्यातील काही कामे अर्धवट असतांना सुध्दा पुर्ण झाल्याचे कागदोपत्री दाखऊन पुर्ण रक्कमेची उचल करून करोडो रूपयांचा अपहार वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी केला असल्याची माहिती दिनांक १५ ऑक्टोंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१६-१७ मध्ये आलापल्ली वनपरिक्षेत्रात जलयुक्त शिवार योजना आणि महात्मा गांधी रोजगार हमी योजना तसेच महाराष्ट्र रोजगार हमी योजनेमधील अनेक कामे नित्कृष्ट दर्जाचे झाली असून यामध्ये अर्थिक गैरव्यवहार वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या वनपरिक्षेत्रातील वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी जलयुक्त शिवार योजना आणि महात्मा गांधी रोजगार हमी योजना तसेच महाराष्ट्र रोजगार हमी योजनेमधील कामे करतांना कागदोपत्री कंत्राटदाराचे नाव दाखवून स्वत:च कामे करून बनावट कागदपत्रे जोडून करोडो रूपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ही कामे करतांना चामोर्शी तालुक्यातील मार्कंडा (कनसोबा) व घोट परिक्षेत्रात अस्तित्वात नसलेल्या दुकानाचे बनावट बिल जोडून त्याव्दारे वनविभागातून लाखो रूपयांची उचल संबधित अधिकाऱ्यांनी केली असल्याचे व या सर्व कामावर बनावट मजूरांचे नाव दाखवून त्यांच्या नावाची मजूरी वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी स्वत: घेतल्याचे देखिल निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, तद्दनुसार संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०२-२०१९) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) सदर योजनेतील कामामध्ये गैरव्यवहार निदर्शनास आलेला नाही, त्यामुळे कारवाईची आवश्यकता भासली नाही.

(६) प्रश्न उदभवत नाही.

नाशिक विभागात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(४९) १३३१५७ (०४-१२-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक विभागात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत १८२ गावातील कामे अपूर्णावस्थेत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील कामे अपूर्ण असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, नाशिक विभागात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत अपूर्ण असलेली कामे तातडीने पूर्ण करण्यासह सदर कामे अपूर्ण ठेवण्यास जबाबदार असणा-या संबधितावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे (०६-०२-२०१९) : (१) व (२) हे खरे नाही.

नाशिक विभागात सन २०१७-१८ मध्ये ८४५ गावांपैकी ऑक्टोबर महिन्यातील पहिल्या आठवड्यात ६९९ गावे १०० % व १४६ गावे ८० % जलपरिपूर्ण झालेली होती. जलयुक्त शिवार अभियानांतर्गत गाव आराखड्यानूसार १९४१४ कामे प्रस्तावित करण्यात आली होती. त्यापैकी माहे डिसेंबर अखेर १८६०१ कामे (९६%) पूर्ण झाली असून ८१३ (४%) कामे प्रगतीत आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भ्ावत नाही.

नाशिक जिल्हयात वृक्षारोपण करण्याचा वन विभागाचा उपक्रम प्रलंबित असल्याबाबत.

(५०) १३३१६० (०७-१२-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वनसंपदा वाढविण्यासाठी शासनाकडून ५० कोटी वृक्षारोपण उद्दिष्ट देण्यात आले असून त्यानुसार नाशिक जिल्हयात अडीच लाख वृक्षारोपण करण्याचा वन विभागाचा उपक्रम विहित मुदतीत यशस्वी झाला नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वृक्षारोपण करण्याची वन विभागाचा मोहिम प्रलंबित रहाण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार नाशिक जिल्हयात वृक्षारोपण करण्याचे उद्दिष्ट विहित वेळेत पुर्ण न करण्यास जबाबदार असणा-या संबधितावर कारवाई करण्यासह जिल्हयातील वृक्षारोपण करण्याचे उद्दीष्ट पुर्ण करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०२-२०१९) : (१), (२) व (३) हे खरे नाही.

सन २०१८ च्या पावसाळयात नाशिक जिल्हयासाठी दिलेले ४७.६० लक्ष रोपे लागवडीचे उददीष्ट पार करुन उददीष्टापेक्षा अधिक म्हणजेच ५३.०२ लक्ष रोपांची लागवड केलेली आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

(५) प्रश्न उदभवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

जितेंद्र भोळे
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.